## <u>नि. ४२ वरील आदेश</u>

१. प्रतिवादी यांनी दि.प्र. संहिता आदेश १४ नियम १, ४-ब प्रमाणे प्राथमीक मुद्दा काढणेकरता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जातील कथन थोडक्यात असे की, प्रतिवादीने त्यांची कैफियत दाखल करून वादीच्या दाव्यास मुंबई कुळ वहिवाट कायदा व शेत जमीन अधिनियम १९४८ चे कलम ८५ ची बाधा येत असल्याची तक्रार उपस्थित केली आहे. वादी व प्रतिवादी यांच्यात कुळ हक्कावरून वाद प्रलंबित आहे. प्रस्तुतचा दावा दाखल होण्यापूर्वी दावा मिळकतीची विक्री प्रतिवादीच्या लाभात होऊन ए. एल. टी.शहापूर यांनी त्यांच्याकडील केस क्र. ३२८/७०५/९३ ने प्रतिवादीच्या लाभात केलेली आहे. तो आदेश आज पर्यंत कायम आहे. त्यानुसार प्रतिवादीस दाखला प्राप्त झालेला आहे. आजही महसूल खात्यात वाद प्रलंबित आहे. त्या वादाची नोटीस प्राप्त आहे. एकंदरीत मूळ वाद हा मूळ व मालक या संदर्भातील आहे. फेर क्र. १५२८ मे. उपविभागीय अधिकारी भिवंडी यांच्याकडे आर.टी.एस. अपील क्र. ५२/९७ दाखल केले आहे. त्यामध्ये आज पर्यंत निर्णय झालेला नाही. अशा परिस्थितीत स्वतंत्र यंत्रणा महसूल खात्याकडे उपलब्ध असताना आड मार्गाचा वापर करून वादीने प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. सबब, <u>*वादीच्या दाव्यास महाराष्ट्र कुळ वहिवाट आणि शेत जमीन अधिनियम १९४८ चे कलम ८५ ची बाधा येते काय ?*</u> असा प्राथमिक मुद्दा निश्चित करून त्याप्रमाणे सर्वप्रथम आदेश व्हावे याकरिता प्रतिवादीने प्रस्तुत चा अर्ज दाखल केला आहे

३. वादी यांनी सदर अर्जास <u>नि.४६</u> कडे म्हणणे दाखल करून त्यास विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अधिकार क्षेत्रा विषयीचा मुद्दा हा लवकरात लवकर घेणे आवश्यक आहे. परंतु, प्रतिवादीने त्यांची कैफयत एक वर्षाच्या विलंबाने दाखल करुन

वादीचा अंतरिम मनाईचा अर्ज प्रलंबित असताना जवळजवळ दीड वर्षाच्या विलंबाने अधिकार क्षेत्रा बाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. प्रस्तुचा दावा हा निरंतर मनाई करता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी क्रमांक २ ते १० यांची दावा मिळकतीमध्ये सामाईक वहिवाट आहे. मूळ सर्वे नंबर ९६/७, एकूण क्षेत्र २ हेक्टर २९ गुंठे असून ते विभागल्यानंतर सर्वे नंबर ९६/७/अ, ९६/७/ब व ९६/७/क असे नंबर देण्यात आले. परंतु, प्रत्यक्षात भूमी अभिलेखाप्रमाणे पोट हिस्से न झाल्यामुळे हद्दी निश्चिती झालेल्या नाहीत याचाच गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र. १ व इतर प्रतिवादींनी वादीचा दावा मिळकती मध्ये हरकत उपस्थित करण्याचा प्रयत्न सुरू केला. अशा प्रकारे प्रतिवादी क्रमांक १ यांच्या कारवायांमुळे वादीच्या दिवाणी हक्कांना बाधा निर्माण झाली व प्रस्तुत दावा दाखल करावा लागला. फेर क्र. १५२८ हा वादीने उपविभागीय अधिकारी, भिवंडी, यांचेकडे आव्हानीत केला असता सदरचा फेर रद्द करण्यात आला. त्याविरुद्ध प्रतिवादी क्रमांक १ यांनी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडे सन २००३ मध्ये अपील दाखल केले. त्यानंतर प्रतिवादी क्रमांक १ यांनी दावा जमिनीलगत बांधकाम सुरू केले. प्रतिवादी क्र. १ यांनी लबाडीने व धूर्तपणे १४ वर्षाच्या विलंबाने उपजिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडे अपील दाखवी केले आहे. प्रतिवादी यांनी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्र बाबत उपस्थित केलेला मुददा हा बेकायदेशीर असून तो न्यायाच्या कसोटीवर टिकणारा नाही. अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित करून प्रतिवादीने न्याय प्रक्रियेत विनाकारण ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे या सर्व कारणास्तव प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी वादीने केली आहे.

४. अर्ज वाचला. म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीच्या विदवान विधीज्ञांना ऐकले.

५. महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील कलम ८५ हे प्रामुख्याने दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रावर निर्बंध घालण्याबाबत आहे. या

कलमानुसार, कुळ कायद्यांतर्गत येणाऱ्या महत्त्वाच्या बाबींचा निकाल लावण्याचा अधिकार केवळ महसूल प्राधिकरणांना (उदा. तहसीलदार, जिल्हाधिकारी) असतो. या कायद्यांतर्गत ज्या प्रश्नांचा निर्णय घेण्याचे अधिकार तहसीलदार (मामलेदार), कृषी जमीन न्यायाधिकरण (Tribunal), जिल्हाधिकारी किंवा राज्य सरकार यांना दिले आहेत, अशा कोणत्याही प्रश्नावर विचार करण्याचा किंवा निर्णय देण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयाला असणार नाही. एखादी व्यक्ती 'कुळ' आहे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयाला नाही. ताब्याचे रक्षण करण्यासाठी दावा दाखल केला असेल आणि त्यात मालकी किंवा कुळवहिवाटीचा कायदेशीर प्रश्न निर्माण होत नसेल, तर अशा परिस्थितीत दिवाणी न्यायालय निर्णय देऊ शकते.

६. ***<u>अनंत ईश्वप्पा हब्बू विरुद्ध रामचंद्र वासुदेव हब्बू</u>*** *या* केसमध्ये आ. मुंबई उच्च न्यायालय यांनी असे स्पष्ट केले आहे की जर दावा केवळ ताबा टिकवून ठेवण्यासाठी (Possession) आणि मनाई हुकुमासाठी असेल, तर दिवाणी न्यायालयाला तो चालवण्याचा पूर्ण अधिकार आहे. जोपर्यंत प्रतिवादी ठोसपणे 'कुळ' असल्याचा पुरावा देत नाही किंवा तसा कायदेशीर बचाव घेत नाही, तोपर्यंत दिवाणी न्यायालय हा दावा फेटाळू शकत नाही.

७. या अनुषंगाने पाहील्यास वादीचा दावा हा निव्वळ मनाईचा असुन वादीने खरेदीखताआधारे दावा मिळकतीत त्याचा कायदेशीर कब्जा सांगितलेला आहे. दावेसोबत दाखल कागदपत्रे वादीच्या कब्जाबाबत प्रथमदर्शनी सांगतात. प्रतिवादीच्या कुळ हक्काबाबतचा प्रश्न अदयाप प्रलंबित आहे. संपुर्ण दावेत मालकीचा व कुळहक्काचा प्रश्न निर्माण होत नाही. त्यामुळे कलम ८५ चा बाध दावेस निर्माण होत नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज आहे त्या स्थितीत नामंजूर करणे योग्य होणार आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करणे येत आहे.

नि.दि.दावा २१/२०१८
पुनम पष्टे वि. कमल यशंवतराव

**:- आदेश -:**

| | |
|---|---|
| **अ.** | अर्ज नामंजुर करण्यात आला. |

URMILA PARASHRAM KOLI
Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2026.03.13 15:42:33 +0530

दि. १३.०३.२०२६

**श्रीमती यु.पी.कोळी**
सह दि. न्या.क.स्तर. शहापूर

**प्रमाणपत्र**

आदेशाची तारीख :- १३/०३/२०२६
तपासण्याची तारीख :- १३/०३/२०२६
सही केलेली तारीख :- १३/०३/२०२६
अपलोड केल्याची तारीख :- १३/०३/२०२६

प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नावः- सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शहापूर

दिनांक-१३/०३/२०२६
स्थळ - शहापूर

एस.एस. काकडे
(लघुलेखिका नि.श्रे.)